जिल्हा परिषद, नंदुरबार
शिक्षण विभाग (प्राथमिक)
मुख्य प्रशासकीय इमारत, टोकरतलाव रोड
नंदुरबार – 425412 (महाराष्ट्र)

ईमेल- ssanandurbar1@yahoo.co.in / eoprimary2@gmail.com दुरध्वनी क्र. (02564)210240

---

जाक्र.जिपनं/शिक्षण/आस्था-1/सेवा- जेष्ठता/तात्पुरती/०९५/2025 नंदुरबार दि.२१/०१/2025

**ज्ञापन**

सामान्य प्रशासन विभाग महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली 1982 दिनांक 21/06/1982, निर्णय क्रमांक एसआरव्ही-2011/प्र.क्र.284/12 दि. 21/10/2011 अन्वये शासन सेवेतील अधिकारी / कर्मचाऱ्यांची जेष्ठतासुची प्रत्येक वर्षी तयार करणे व प्रसिध्द करणे बाबत सर्वकष धोरण दिलेली आहेत. त्या धोरणानुसार विविध संवर्गातील नव्याने भरती / पदोन्नतीने कार्यरत कर्मचाऱ्यांची तात्पुरती जेष्ठता सुची प्रसिध्द करणे आवश्यक आहे.

त्यानुसार प्राथमिक शिक्षण विभाग जिल्हा परिषद, नंदुरबार अंतर्गत कार्यरत **प्राथमिक शिक्षक (माध्यम-मराठी/उर्दु/गुजराती) व दिव्यांग** या संवर्गाची दि. 01/01/2025 ची तात्पुरती जेष्ठता सुची तयार करुन याअन्वये प्रसिध्द करण्यांत येत आहे. प्रस्तुत जेष्ठता सुची संबंधितांच्या अवलोकनास सादर करण्यांत येऊन स्वाक्षरी घेण्यात यावी. सदर स्वाक्षरी घेण्यात आलेल्या पोच दप्तरी अभिलेखात जतन करण्यात यावी. सदर यादिमध्ये संबंधितांच्या काही हरकती / आक्षेप / सुचना असल्यास सदर हरकती / आक्षेप / सुचना प्राप्त करुन आवश्यक असल्यास पुरावा दस्ताऐवज सोबत घेण्यात यावेत. सदर हरकती / आक्षेप / सुचना नियमानुसार योग्य / अयोग्य बाबत शासन निर्णयातील तरतुदींनुसार आपल्या अभिप्रायासह एकत्रीत हरकती / आक्षेप / सुचना पुढील कार्यावाहीसाठी या कार्यालयास सादर करण्यात याव्यात तसेच, परस्पर अथवा आपल्या मार्फत न सादर केलेल्या हरकती / आक्षेप / सुचनांवर या कार्यालयाकडुन कार्यवाही करण्यात येणार नाही यांची संबधितांना माहिती करवुन देण्यात यावी.

सदर हरकती / आक्षेप / सुचना जेष्ठता सुची प्रसिध्दी ज्ञापन दिनांकापासुन 15 दिवसाच्या आत सादर करण्यात याव्यात.

Signed by Vandana Karansing Valvi
Date: 22-01-2025 15:58:58

(वंदना के. वळवी)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, नंदुरबार

प्रत :- म.उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (सा) जिल्हा परिषद, नंदुरबार यांना माहितीसाठी सविनय सादर.
प्रत :- माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी
प्रत :- सर्व संबंधीतांना त्यांचे कार्यालय प्रमुखांमार्फत

1. म.गट विकास अधिकारी पंचायत समिती ------------------ (सर्व), जिल्हा नंदुरबार
2. गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती ------------------------(सर्व), जिल्हा नंदुरबार

2/-सर्व संबंधितांना सेवा जेष्ठतासुचिची एक प्रत देवुन त्यांची दिनांकीत स्वाक्षरीची पोहोच दप्तरी ठेवावी.

3. नोडल अधिकारी, आय.टी.सेल, जिल्हा परिषद, नंदुरबार

2/- शिक्षण विभाग (प्राथमिक), जि.प.नंदुरबार अंतर्गत **प्राथमिक शिक्षक (माध्यम-मराठी/उर्दु/गुजराती) व दिव्यांग** संवर्गाची तात्पुरती सेवा जेष्ठता यादी जिल्हा परिषद नंदुरबार च्या www.zpndbr.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यांत यावी.

(वंदना के. वळवी)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, नंदुरबार